**नि.क्र. २९**

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः – **दिपांजली विनोद ढोके**
वयः – ४२ वर्षे, व्यवसायः – घरकाम,
निवासस्थान :– नंदवन लेआउट ऐहतेशाम अली लेआउटजवळ
वरोरा तह.वरोरा, जि चंद्रपूर .

**सरतपासणी सरकार पक्षातर्फे श्री. ए. एफ. फुलझेले अति. सरकारी अभियोक्ता**

०१. माझ्या घरी मी, माझे पती आणि दोन मुले असे मिळून राहतो. मी बौध्द समाजाची आहे. माझी जात शेडल्यूड कास्टमध्ये मोडते. माझ्याजवळ मुळ जातीचे प्रमाणपत्र नाही. आता मला प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत दाखवण्यात आली. ते माझेच आहे. माझे लग्नापूर्वीचे नाव दिपांजली शिवशंकर भुजाडे आहे. जातीच्या प्रमाणपत्रास **आर्टीकल अ** देण्यात येते. मी शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येते. मी आरोपीस ओळखते. ते माझ्या घराशेजारी घटनेच्या एक वर्षापूर्वी राहत होते. आरोपी हे ओ.बी.सी. आहे.

०२. घटना दिनांक १३/०१/२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता घनशाम मोडक यांच्या घरी नंदनवन लेआउट येथे घडली. त्यावेळी मी घनशाम मोडक यांचेकडे किरायाने राहत होती. घटनेच्या वेळी मी आणि माझा लहान ४ वर्षाचा मुलगा माझ्या घरी होता. त्यावेळी मी घरकाम करत होते. माझे पती

डयुटीवर आणि दुसरा मुलगा शाळेत गेला होता. आरोपी माझ्या घरात घुसला. त्याने माझा हात धरुन ओढताण करण्याचा प्रयत्न केला. आरोपी मला म्हणाला की, तु मला खुप आवडते आणि काम करु दे. त्यामुळे मी घाबरुन गेली होती. मी त्याच्या हाताला धक्का देवून घराबाहेर निघाली. आरोपी माझ्या मागे आला. त्याने मला जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यानंतर तो गेटच्या बाहेर निघून गेला. त्याने भितीचे वातावरण पसरवून त्याची स्वतःची गाडी जाळून निघून गेला. मी माझ्या पतीला फोन करुन घडलेला प्रकार सांगीतला. त्यानंतर माझ्या पतीने समजावून पो.स्टे. ला घेवून गेला.

०३. मी पो.स्टे. ला घटनेची फिर्याद दिली होती. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. फिर्यादीस **नि.क्र.३१** देण्यात येते. आता मला प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येते.

०४. फिर्याद दिल्यानंतर पोलिस आमचे घरी आले होते आणि त्यांनी पंचनामा केला. त्यांनी ती गाडी जप्त केली. पोलिसांनी माझे बयान घेतले होते. मी आरोपीस ओळखू शकते. तो न्यायालयात हजर नाही.

**उलट तपासणी आरोपीतर्फे वि. ॲड. ए.यु. अलोणे.**

०५. हे खरे नाही की, मी आरोपीस घटनेच्या २–३ वर्षाआधी पासून ओळखत होती. हे खरे आहे की, घटनेपूर्वी एक वर्षे मी घनशाम मोडक यांच्या घरी वास्तव्यास होती. द्वारका नगरी मध्ये मी २–३ वर्षे राहिली. हे खरे आहे की, द्वारका नगरी मध्ये २–३ वर्षे आरोपी सुध्दा माझ्या शेजारी राहायला होता.

या काळामध्ये आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार दिली नाही. साक्षीदार सांगते की, भितीमुळे दिली नाही. मी माझ्या पतीला आरोपीबाबत त्यावेळी सांगीतले नव्हते. हे खरे आहे की, त्यावेळी आरोपी रेडे यांच्या घरी माझ्या शेजारी किरायाने राहत होता. हे खरे आहे की, त्यावेळी सुध्दा माझे पती पिंपळगाव येथे शाळेमध्ये जात होते.

०६. घनशाम मोडक यांच्या घरामध्ये समोरुन एक रस्ता आहे. त्यांच्या घरासमोर रस्ता असून घराच्या तिन्ही बाजूला लागून ईतर घरे आहेत. माझे आजुबाजुच्या लोकांशी आणि माझ्या समाजातील लोकांशी बोलचाल होती. आरोपीचे घरमालक रेडे यांच्यासोबत यांच्यासोबत माझे बोलचाल होती. हे खरे आहे की, हया घटनेपूर्वी आरोपी माझ्या घरात कधीही जबरदस्तीने आला नाही. साक्षीदार सांगते की, मला त्याची भिती होती. त्यामुळे मी नेहमी घराला कुलुप लावून ठेवत होती. हे खरे आहे की, मी राहत असलेल्या घरापासून पो.स्टे. ०१ कि.मी. अंतरावर आहे.

०७. हे खरे नाही की, घटनेच्या दिवशी माझे पती घरी आहे किंवा नाही याबाबत आरोपीला माहिती नव्हती. हे खरे आहे की, आजुबाजुच्या घरात लोक हजर होते. हे खरे आहे की, घटनेच्या दिवशी मी आणि माझा लहान मुलगा पूर्ण घरात हजर होते. हे खरे आहे की, त्यादिवशी पुनम पेटकर आणि तिची बहिण कॉलेजला गेले होते. हे खरे नाही की, माझे शेजारच्या लोकांना आरोपी नेहमी माझ्या घरी येत असतांना दिसायचा. हे खरे नाही की, माझ्या पतीला आरोपी घरी येतो हे माहीत नव्हते. साक्षीदार सांगते की, आरोपी येतच नव्हता. निलेश हा कंम्प्यूटर लॅपटॉप दुरुस्तीचे काम करतो. हे खरे नाही की, घटनेच्या

दिवशी निलेश हा कंम्प्यूटर लॅपटॉप दुरुस्तीकरिता आला होता. घटनेच्या दिवशी माझे पती दुपारी १२.०० वाजता घरी आले. हे मला माहीत नाही की, घटनेच्या दिवशी माझ्या पतीने आरोपीला माझ्या घराच्या बाजुने जातांना पाहिले. हे खरे नाही की, माझे पती आले त्यावेळी आरोपीची मोटरसायकल माझ्या घरासमोर उभी होती. साक्षीदार सांगते की, मोटरसायकल पेटत होती. हे खरे नाही की, माझे पती आल्यानंतर त्यांनी मला आरोपीच्या मोटरसायकल बाबत विचारले.

०८. माझे पती घरी आल्यानंतर अर्धा तासाने आम्ही पो.स्टे. ला गेलो. मी तक्रार पो.स्टे. ला गेल्यावर लगेच दिली. असे घडले नाही की, पोलिसांनी रात्री पुन्हा माझ्यापासून तक्रार लिहून घेतली. पोलिस हे तक्रार दिल्यानंतर गाडीचा पंचनामा करण्यासाठी सायंकाळी ४.०० ते ५.०० वाजताच्या दरम्यान आले होते. असे घडले नाही की, पहिले पोलिस आले आणि नंतर मी तक्रार दिली. असे घडले नाही की, माझे पती आल्यानंतर त्यांनी मला पो.स्टे. ला फोन करण्यास सांगीतले, थोडयाच वेळात पोलिस आले त्यांनी त्यांची कार्यवाही केली त्यानंतर मी आणि माझे पती पो.स्टे. ला जाूवन फिर्याद दिली. आता माझ्या बयानातील **रेखांकित भाग अ** मला वाचून दाखवण्यात आला. तो बरोबर नाही. मी पोलिसांना तसे सांगीतले नाही. पोलिसांनी माझ्या बयानात तसे कां लिहिले याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलिस बयानात असे सांगीतले नाही की, आरोपीने मला 'तु मला खुप आवडतेस' असे बोलला होता.

०९. सिंधूबाई ही माझे आणि आरोपीकडे घरकाम करायला होती. हे

मला माहीत नाही की, त्यावेळी सिंधूबाई ही आरोपीकडे संध्याकाळचा स्वंयपाक करायची. हे खरे नाही की, आरोपी दिवसा माझ्याकडे जेवायला यायचा. अर्पीता वानखेडे माझी मैत्रीण आहे. हे खरे नाही की, अर्पीता वानखेडे हिच्यामार्फत माझी आरोपीसोबत ओळख झाली होती. हे खरे नाही की, अर्पीताने माझा मोबाईल नंबर आरोपीला दिला होता. हे खरे नाही की, घटनेच्या दिवशी माझे पती अचानक घरी आले होते. हे खरे नाही की, माझ्या पतीला आरोपीची गाडी घरासमोर दिसल्यामुळे त्यांनीच आरोपीची गाडी जाळली. हे खरे नाही की, गाडीला आग लागल्यामुळे शेजारच्या लोकांनी पोलिस आणि फायरब्रिगेडला बोलावले होते. हे खरे आहे की, सायंकाळी ४—५ वाजता पोलिस त्यांची कार्यवाही करुन निघून गेले होते. हे खरे नाही की, माझ्या पतीवर गाडी जाळल्याचा अपराध दाखल होईल त्यामुळे माझे पती सायंकाळी ७.०० वाजता मला पो.स्टे. ला घेवून गेले. हे खरे नाही की, माझ्या पतीने पोलिसांना जी घटना सांगीतली ती पोलिसांनी लिहून घेतली. हे खरे नाही की, माझया पतीला वाचविण्यासाठी मी खोटी तक्रार दिली. विठोबा मुन माझ्या पतीच्या ओळखीचे आहे. प्रमोद गोटे हे माझे नंदई आहे. हे खरे नाही की, आरोपीचे नेहमी माझ्याकडे येणे—जाणे असल्यामुळे माझ्या शेजारच्या लोकांनी हया घटनेबाबत पोलिसांना बयान दिले नाही. हे खरे आहे की, पंचनामयासाठी माझे नातेवाईक आणि माझ्या पतीच्या परिचयाचे लोकांना बोलावले. हे म्हणणे खरे नाही की, मी असे खोटे सांगत आहे की, घटनेच्या दिवशी आरोपी माझ्या घरात घुसला, त्याने माझा हात धरुन ओढताण करण्याचा प्रयत्न केला, आरोपी मला म्हणाला की, तु मला खुप आवडते आणि काम करु दे, त्यामुळे मी घाबरुन गेली होती, मी त्याच्या हाताला धक्का देवून घराबाहेर निघाली, आरोपी माझ्या मागे आला, त्याने मला जिवाने

मारण्याची धमकी दिली, त्यानंतर तो गेटच्या बाहेर निघून गेला आणि त्याने भितीचे वातावरण पसरवून त्याची स्वतःची गाडी जाळून निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, मी असे खोटे सांगत आहे की, मी बौध्द समाजाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात पहिल्यांदा सांगत आहे की, आरोपीची भिती होती आणि हया घटनेपूर्वी त्यामुळे कधीही तक्रार केली नाही आणी आरोपीबाबत माझ्या पतीला किंवा ईतर कोणालाही सांगीतले नाही आणि मी भितीमुळे नेहमी कुलूप लावून ठेवत होती. हे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण

फेर तपास – काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by ATUL KESHAOLAL SHAH
Date: 2026.08.01 17:14:22 +0530

**(अतुल के. शाह )**
विशेष न्यायाधिश, वरोरा.
दि. ३१/०७/२०२६

माझे समक्ष

Digitally signed by ATUL KESHAOLAL SHAH
Date: 2026.08.01 17:14:28 +0530

**(अतुल के. शाह )**
विशेष न्यायाधिश, वरोरा.
दि. ३१/०७/२०२६